पुढारी ११

रविवार, ४ फेब्रुवारी २०२४

# 'विवेकानंद'च्या शहाना रेवणकरची निवड

**कोल्हापूर :** कन्याकुमारी येथे झालेल्या राष्ट्रीय प्लोअर स्पर्धेमध्ये विवेकानंद कॉलेजची शहाना रेवणकरची (बीसीएस-भाग २) महाराष्ट्र संघात निवड झाली होती. स्पर्धेमध्ये महाराष्ट्र संघातून शहाना रेवणकरला सुवर्णपदक प्राप्त झाले आहे. स्पर्धेतून तिची फिनलँड (युरोप) येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी भारतीय संघामध्ये निवड झाली आहे. या यशाबद्दल तिचे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अभिनंदन केले. खेळाडूस ज्युनिअर जिमखाना विभागप्रमुख प्रा. सहिदा कच्छी, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. पल्लवी देसाई, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

मुंबई, ठाणे, पालघर येथून प्रसिद्ध आणि रायगड, रत्नागिरी, पुणे, नाशिक येथून वितरीत

द ग्लोबल टाइम्स

मराठी दैनिक | रविवार | भारतीय समाज मनाचे प्रतिबिंब

Register No. : RNI - MAHAMAR /2012/44621 | मुंबई | अंक : २३ | वर्ष : १२

Web Site : www.theglobaltime.com | दि. ४ फेब्रुवारी २०२४ | पाने : ०८ | किंमत : ₹ ३.००

# शहाना रेवणकरची आंतरराष्ट्रीय फ्लोअर बॉल स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड



**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजच्या शहाना सुरेश रेवणकर (बी. सी.एस.भाग २) हिची फिनलँड (युरोप) येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय फ्लोअर बॉल स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे.

कन्याकुमारी येथे झालेल्या राष्ट्रीय फ्लोअर स्पर्धेमध्ये शहाना रेवणकर हिची महाराष्ट्र संघातून निवड झाली होती. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र संघातून शहाना रेवणकर हिला सुवर्णपदक प्राप्त झाले. या स्पर्धेमधून तिची फिनलँड (युरोप) येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धे साठी भारतीय संघामध्ये निवड झाली.

या यशाबद्दल शहाना हिचे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

शहाना रेवणकर या खेळाडूस ज्युनिअर जिमखाना विभाग प्रमुख प्रा. सहिदा कच्छी, प्रा. हवलदार, एन. आर. सणगर, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, बीसीएस विभाग प्रमुख प्रा. पल्लवी देसाई, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळाले.

04/02/24

4.2.24